दै. सामना दि. १२.१२.२०१९

सामना १२/१२/१९

# कोकुलवार हल्लाप्रकरणी पाच आरोपींना पोलीस कोठडी

## मोक्का न्यायालयाचा निर्णय

नांदेड, दि. ११ (प्रतिनिधी)- इतवारा पोलीस ठाण्याअंतर्गत असलेल्या भागात गोविंद कोकुलवार यांच्यावर तीन महिन्यांपूर्वी झालेल्या हल्ल्याप्रकरणी सहापैकी पाच आरोपींना मोक्का लावण्याचा निर्णय घेण्यात आला. या सर्व आरोपींना मोक्का न्यायालयात उभे केले असता त्यांना सात दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली.

चार महिन्यांपूर्वी गोविंद कोकुलवार यांच्या घरासमोर ते कारमधून उतरत असताना काही व्यक्तींनी त्यांच्यावर गोळीबार केला. त्यात कोकुलवार जखमी झाले. या प्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करण्यात आला. या प्रकरणी बजरंग ऊर्फ योद्धा भीमराव नरवाडे (३६, रा. अंबाळा, ता. हदगाव), राजू देवराव राऊत (२३, रा. बारड, ह.मु. तरोडा), गुरुचरणसिंघ ऊर्फ लक्की गिल (३०, रा. अबचलनगर, नांदेड), सय्यद नजिदोद्दीन ऊर्फ गुड्डू मुनिरोद्दीन (३८, रा. आसरानगर, नांदेड), सुभाष मोहन पवार (४२, रा. बरड शेवाळा, ता. हदगाव) आणि हरविंदरसिंघ ऊर्फ रिंदा संधू (रा. नांदेड) हे पाच आरोपी निष्पन्न झाले. यापैकी कुख्यात गुंड हरविंदरसिंघ ऊर्फ रिंदा हा फरार आहे. इतर पाच आरोपींना १० डिसेंबर रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांनी संभाजीनगरच्या मोक्का न्यायालयात हजर केले. न्यायालयाने या पाचही आरोपींना सात दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली. पुढील तपास धनंजय पाटील करीत आहेत.

दै. [illegible]

## ...क्षण केंद्र

...होते, हेच सिद्ध होते. आजही ...माझ्या मनात आहे. भागातील ...कास तसेच तरुण मंडळींच्या ...काम करायचे होते. यामुळे ...तली. खरे तर नांदेड जिल्हा ...शिक्षण केंद्रच आहे. त्यामुळे ...अधिकारी महाराष्ट्रातच काय, ...चांगल्या पद्धतीने काम करू ...नांदेडकरांनी बोलवावे, मी ...कामासाठी हजर आहे, अशा ...व्यक्त करून पोलिसांच्या नूतन ...महिला विश्रामगृहाला शुभेच्छा ...मनोज लोहिया, विजयकुमार ...आणी झाली.



नांदेड : इतवारा पोलीस ठाणे महिला विश्रामगृह व इतवारा पोलीस ठा... इमारतीच्या नूतनीकरणाचे उद्घाटन माजी अतिरिक्त पोलीस महासंचालक, मह... राज्य मुंबई व्ही.ही. लक्ष्मीनारायण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नांदेड... विशेष पोलीस महानिरीक्षक मनोज लोहिया, पोलीस अधीक्षक विजयकुमार म... अप्पर पोलीस अधीक्षक दत्तराम राठोड आदी दिसत आहेत.